भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.३३२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/०५/२०१७

१) मोटार पंपाची चोरी . :–

दिनांक १४/०५/२०१७ चे १८.३०ते १५/०५/२०१७ चे ०९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी हिवराज लक्ष्मण कावरे वय ६२ वर्ष, रा. कपील नगर हनुमान मंदीर जवळ भंडारा यांनी नवीन घरकामाकरीता बोरवेल वर लावलेली सबमर्सिबल मोटार पंप १ एचपी किंमती ६,०००/–रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

२) अल्पवयीन मुलगी पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १२/०५/२०१७ चे १०.०० ते १३.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ची अल्पवयीन मुलगी हिला पवनी येथे दळणाकरीता व निघवी येथे मजुरीचे पैसे आनण्याकरीता पाठविले असता ती निघवी येथुन परत पवनी येथे फिर्यादीची मैत्रीण हिचे घरी जावुन तिथुन घरी जाते म्हणुन बसस्टॅन्ड येथे जाण्यास निघाली तेव्हा पासुन घरी परत आली नाही तिचा आजुबाजुला व नातेवाईकात आज पावेतो शोध घेतला असता मिळुन न आल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व शासन परिपत्रक क्रमाक सा.आर.टी. ०९१२/ प्र.क्र. ५४/५४/पोट–१३ गृहविभाग दिनांक १० नोव्हेबर २०१४ अन्वये पोस्टे. पवनी येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

३) क्षुल्लक कारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन बासाचे काठीने डोक्यावर मारुन जखमी करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १५/०५/२०१७ ते ०९.०० वा. दरम्यान यातील आरोपी हा काही दिवसा पुर्वी फिर्यादीचे शेनखताचे खडयामध्ये त्याच्या भाच्यासाठी झोपडी तयार करीत असतांना मनाई केली होती घटनेच्या एक दिवसा पुर्वी आरोपीने फिर्यादीचा नाव घेवुन शिवीगाळ केली होती फिर्यादीस आरोपी हा पानटपरीवर भेटला असता तु रात्री विनाकारण शिवीगाळ कशाला करीत होता असे बोलले असतांना आरोपीने तु मला विचारणारा कोण असे म्हणुन शिवीगाळ करुन बासाचे काठीने फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी केले व पुढे जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी शंकर भानुदास मेनवाडे वय ४२ वर्ष, रा. सिंधपुरी यांचे बयान व एमएलसी रिपोर्ट वरुन पो. स्टे. पवनी येथे कलम ३२४,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

४) मोटार सायकल विरुध्द दिशेने येवुन निष्काळजीपणे मोटार सायकल चालकास धडक देवुन दोघांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोदं . :–

दिनांक १४/०५/२०१७ चे १८.०० ते १८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी दोगेंद्र खुशाल लांजेवार वय २२ वर्ष रा. उमरी हा आपली आई लक्ष्मी खुशाल लांजेवार वय ५५ वर्ष, रा. उमरी हिचे सोबत आपली मोटार सायकल क्र एमएच ३६ सी/ ९६८४ ने साकोली कडुन उमरीकडे जात असता उमरी गावालगत विरुध्द दिशेने येणाऱ्या आरोपी मोटार सायकला चालकाने आपले ताब्यातील वाहन वेगाने, अविचाराने, हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकला धडक देवुन फिर्यादी व त्याची आई यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. साकोली येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

५) ट्रॅक्टर मध्ये रेती चोरी करुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १४/०५/२०१७ चे ११.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी देवानंद वासुदेव उपराळे वय ४० वर्ष, रा. तलाठी कार्या. कोर्थुना ह. मु. विनोबा नगर शिवआटा चक्की जवळ तुमसर हे लोकसेवक असुन अवैद्य रित्या चोरी वाहतुक प्रतीबंधक पेट्रोलींग करीत असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर मध्ये १ ब्रास रेती किंमती १०,४००/–रु. ची चोरी करुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने तसेच फिर्यादी व लोकसेवक यांनी ट्रॅक्टर थांबविण्यास सांगितले असता त्याने ट्रॅक्टर पळवुन नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोस्टे. वरठी येथे कलम ३७९,१८६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंदे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

६) संगनमत करुन क्षुल्लक कारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन दगडाने डोळयाचे वर मारुन जखमी करुन धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १५/०५/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस तुने आरोपी क्र १ यास कश्याला मारपीट केली यावरुन तीनही आरोपीतांनी फिर्यादी सोबत भांडण व शिवीगाळ करुन दगडाने डावे डोळयाचे वर आरोपी क्र. ३ ने मारुन जखमी करुन धमकी दिल्याने फिर्यादी सुरेश उरकुडा मेश्राम वय ३१ वर्ष, रा. निलज यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. करडी येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोलंकी पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

७) अनोळखी चारचाकी वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल चालकास धडक देवुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १५/०५/२०१७ चे १०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी अनील गोविंद रावजी हातझाडे वय ५१ वर्ष, रा. यशोधा नगर खात रोड भंडारा हा आपले मोटार सायकल क्र. यु ८६५३ ने कोक्यावरुन भंडारा येथे येत असतांना मागेहुन येणाऱ्या यातील अनोळखी चारचाकी आरोपी वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे भावाचे मोटार सायकला धडक देवुन मोटार सायकल सह खाली पडुन जखमी करण्यास करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची माहिती न देता पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. कारधा येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४,१३४/१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

८) विहिरीतील गाळ काढतांनी डोक्यावर दगड पडुन डोक्यास मार लागल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–

दिनांक ०१/०५/२०१७ चे ०९.०० वा दर. यातील मृतक भाष्कर प्रमलाल मारबते वय ४८ वर्ष, रा. पिंपरीचुन्नी हा शेतमालक गुणाजी गोकुल पटले यांच्या शेतातील विहरीतील गाळ काढण्याचे कामावर होता विहीरीतुन गाळ बादलीत टाकुण शेतमालक हा बादली वर काढीत असता मृतकच्या अंगावर दगड पडल्याने त्याच्या डोक्यास मार लागल्याने उपचाराकामी ग्रामीण रुग्णालय सिहोरा नंतर सु. बो. दवाखाना नंतर सामान्य रुग्णालय भंडारा येथे उपचार करुन त्याचा काकेभाऊ मुकेश गुणाजी मारबते यांने पुढील उपचारा कामी मेडीकल कॉलेज येथे भरती केले असता उपचारा दरम्यान १/०५/२०१७ चे १८.४५ वा. मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागुपर येथे मर्ग क्र ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. खोब्रागडे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

९) अवैध दारु/ जुगार अडयावर धाडी . :–

दिनांक १५/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. भंडारा, पवनी व लाखांदुर येथे अवैध दारु/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २० लिटर हातभट्टी दारु किंमती २,०००/रु., ६६ लिटर २४० मिली लिटर बिअर विदेशी दारु + स्कॉपीओ गाडी किंमती २,४८,०००/–रु. तसेच जुगारातुन ३,२८७/–रु. असा एकुण किंमती २,५३,२८७/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहेत.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १५/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०८, तीन सिटर वाहनांवरती १५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.